लोकमत

# खेळाडू असे का वागतात?

**क्रीडा विश्वातून**



**सुनील वालावलकर**
क्रीडा संघटक

**खेळात ईर्षा, जोश, उन्माद निर्माण होणे स्वाभाविक जरी असले तरीसुद्धा या सर्व मानवी नैसर्गिक भावनांचे विरेचन होण्यासाठीच क्रीडा उपक्रमांचे आयोजन केले जाते, याचा विसर क्रीडापटूंना होता कामा नये.**



**अलीकडेच पार** पडलेल्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेच्या उपांत्य फेरीत पराभूत मल्ल शिवराज राक्षे याने रागाच्या भरात सामना संपल्यानंतर पंचांना लाथ मारली. उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीमध्ये घडलेल्या या प्रकारामुळे अवघे क्रीडाविश्व हादरून गेले. व्हिडीओ रिव्ह्यूमध्ये शिवराज राक्षेचे खांदे जमिनीला टेकलेले दिसत नव्हते, तरीसुद्धा राक्षेची प्रतिक्रिया समर्थनीय ठरत नसल्याचे मत क्रीडातज्ज्ञांकडून व्यक्त होत आहे.

खरं म्हणजे, कोणत्याही क्रीडा प्रकारात खिलाडूवृत्तीला सर्वात जास्त मान असतो. खिलाडूवृत्ती वाढीस लागावी यासाठीच क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले जाते; परंतु अलीकडच्या काळात अखिलाडूवृत्ती सर्वच क्रीडा उपक्रमांतून वाढीस लागली असल्याचे अनुभवास येते. स्पर्धांमधील स्वतःचा पराभव सहजपणे स्वीकारता न येण्याच्या घटना वारंवार घडत आहे, हे चिंताजनक आहे.

अर्थात क्रीडा स्पर्धादरम्यान घडणाऱ्या अशोभनीय घटनांचा इतिहास तसा जुना आहे. १९९७ साली बॉक्सिंगमध्ये माइक टायसनने त्याच्या प्रतिस्पर्ध्याचा कान चावल्याची घटना कोणीच कधी विसरू शकणार नाही. फुटबॉल, बेसबॉल, रग्बीच्या सामन्यांदरम्यान खेळाडू आणि त्यांचे पाठीराखे, प्रेक्षक यांच्यामध्ये खटके उडण्याच्या घटना युरोपभर होत असतात. बऱ्याचवेळा क्रीडांगणाचे रूपांतर रणांगणात होण्याइतपत परिस्थिती हाताबाहेर जाते. खेळांमधून निर्माण होणारा जोश खेळाडूंमार्फत प्रेक्षकांपर्यंत पोहोचताना एक प्रकारची गुर्मी तयार होते आणि त्यातून बऱ्याचवेळा आणीबाणीची परिस्थिती तयार होते. नेमक्या अशाच प्रसंगी खेळाडूंची जबाबदारी वाढते आणि त्यांच्याकडून अधिकच्या खिलाडूपणाची अपेक्षा करण्यात येते.

खेळात ईर्षा, जोश, उन्माद निर्माण होणे



स्वाभाविक जरी असले तरीसुद्धा या सर्व मानवी नैसर्गिक भावनांचे विरेचन होण्यासाठीच क्रीडा उपक्रमांचे आयोजन केले जाते, याचा विसर क्रीडापटूंना होता कामा नये. खेळाडू आणि कलावंतांची जबाबदारी फार मोठी असते. कारण समाजातील एक मोठा वर्ग त्यांच्याकडे आदर्श म्हणून बघत असतो. म्हणूनच पुल्लेला गोपीचंद, सचिन तेंडुलकर यांसारख्या खेळाडूंवर प्रेक्षक भरभरून प्रेम करत असतात. याउलट फ्रान्सचा फुटबॉलपटू झिनेदिन झिदान, ज्याने भर सामन्यामध्ये तेही विश्वचषक सामन्यात प्रतिस्पर्धी खेळाडूच्या छातीवर आपल्या डोक्याने धडक मारली होती. या एका घटनेने झिदानची लोकप्रियता कायमची घटली.

खेळाडू असे का वागतात, यावर अनेक पातळ्यांवर संशोधन होत असते. काहींच्या मते, क्रीडा उपक्रमांमधून खेळाडूंच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होत असतो, खेळांमुळे व्यक्तिमत्त्वाला विधायक पैलू पडतात, तर काहींच्या मते खेळाडू मुळात जसा आहे आणि त्याची वर्तनशैली जशी आहे, त्याचे प्रतिबिंब त्याच्या खेळामध्ये प्रकट होत असते. काही तज्ज्ञ असे मानतात की, खेळाडू आपल्या स्वतःच्या आंतरिक व्यक्तिमत्त्वानुसार खेळाची निवड करतात. अन्य क्षेत्राप्रमाणेच क्रीडा क्षेत्रसुद्धा तीव्र स्पर्धेला तोंड देत आहे. त्यामुळे उच्च आदर्शवादाची अपेक्षा केवळ खेळाडूंकडून करणे अवास्तव असले तरी चुकीचे नाही.